दूरध्वनी: (020) 24476938
ईमेल:cpddept@maa.ac.in

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र,
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे-४११०३०.

जाक्र.राशैसंप्रपम/साव्यावि/गा.स./२०२४/ 03255.

दिनांक :- २५/०६/२०२४
05/07/2024

प्रति,

१) सर्व उपसंचालक, प्राचार्य, वरिष्ठ अधिव्याख्याता, सहा. संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे
२) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)
३) प्राचार्य, प्रादेशिक विद्या प्राधिकरण (सर्व)

**विषय :- स्वयंसेवी संस्थांच्या गाभा समितीतील मान्य प्रस्तावासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना....**

**संदर्भ :- १)** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.डायट ४५१६/(४०/१६)/प्रशिक्षण, दि.१७ ऑक्टोबर २०१६
२) मा. संचालक, प्रस्तुत कार्यालय यांची मराठी विभागाची मान्य टिपणी दि. ०६.०५.२०२४

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे च्या वतीने गाभा समिती बैठक शासन निर्णय दि.१७ ऑक्टोबर २०१६ अन्वये आयोजित करण्यात येते. सदर बैठकीत परिषदेअंतर्गत विविध विभागाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर चर्चा होऊन निर्णय घेतला जातो. त्यानंतर मान्य प्रस्ताव संबंधित विभागाकडून शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येतो.

स्वयंसेवी संस्थेस प्रकल्प / उपक्रम राबविण्यास गाभा समितीमार्फत मान्यता दिल्यानंतर यापूर्वीच्या अटी व शर्तीसोबत पुढील बाबींचा समावेश करण्यात यावा.

१) प्रकल्प / उपक्रम सुरु करताना स्वयंसेवी संस्थेने संबंधित जिल्हयाच्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेला संपूर्ण कामाचे नियोजनाची माहिती, कर्मचा-यांची नावे, कामकाजाची पध्दत, वेळापत्रक, कामाची ठिकाणे, उपक्रमात अपेक्षित सहभागी शिक्षक / विद्यार्थी संख्या इ.माहिती सादर करावी. नवीन बदल झाल्यास त्याची कल्पना संबंधित जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेला कळविण्यात यावे. यासाठी अहवालाचा नमुना प्रपत्र १ प्रमाणे असावा.
२) स्वयंसेवी संस्थांनी उपक्रम / कार्यक्रम सुरु झाल्यावर दर तीन महिन्यांनी झालेल्या कार्यवाहीचा अहवाल जि.शि.प्र.संस्थेस सादर करावा. ज्यात फलनिष्पत्ती विषयीसुध्दा ठोस व आकडेवारीसह निष्कर्ष असावेत. यासाठी प्रपत्र २ प्रमाणे नमुना वापरावा.

कृ.मा.प.

३) प्रकल्प / उपक्रम पूर्ण झाल्यानंतर अंतिम अहवाल संबंधित जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेला संबंधित स्वयंसेवी संस्थांनी प्रपत्र ३ च्या नमुन्यात सादर करावे. सदरील अहवालासाठी जि.शि.प्र.संस्थेने संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांचाही वस्तुनिष्ठ व उपयोगितेविषयीचा स्वयंस्पष्ट अभिप्राय लक्षात घ्यावा.

४) गाभा समितीद्वारे मंजूर उपक्रमाचा प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेस सादर करावयाचा अंतिम अहवाल प्रपत्र ४ च्या नमुन्यात संबंधित विभागास सादर करावा व त्याची एक प्रत संबंधित संस्थेस दयावी.

५) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतील संबंधित विभागाने प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेकडून प्राप्त तिमाही व अंतिम अहवाल सात दिवसात मा.संचालक यांचेकडे टिपणीसह स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रपत्र ४ च्या नमुन्यात सादर करावेत.

६) गाभा समितीच्या निर्णयानुसार प्रगतीचा आढावा घेऊन संस्थेस पुढील शैक्षणिक वर्षासाठी मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेणेत येईल.

७) प्रकल्प / उपक्रमास दिलेली मान्यता आवश्यकतेनुसार केंव्हाही रद्द करण्याचे अधिकार मा.संचालक, रा.शै.सं.व प्र.प.महाराष्ट्र, पुणे तथा अध्यक्ष, गाभा समिती यांचेकडे राहतील.

उपरोक्तप्रमाणे ज्या स्वयंसेवी संस्थांना सन २०२३-२४ मध्ये गाभा समितीमार्फत मान्यता देण्यात आली आहे त्यांना वरीलप्रमाणे अंतिम अहवाल जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेस त्वरीत सादर करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

16 03/07/25

(राहूल रेखावार, भा.प्र.से.)
**संचालक,**
**राज्य शैक्षणिक संशोधन व**
**प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-**

१) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२

२) मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, शिक्षण आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, पुणे

गाभा समितीद्वारे मंजूर उपक्रम ज्या जिल्ह्यात राबवयाचे त्या जिल्ह्याच्या
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेकडे सादर करावयाची माहिती

प्रपत्र १

## स्वयंसेवी संस्थेने उपक्रम / कार्यक्रम सुरु करण्यापूर्वी सादर करावयाच्या माहितीचा नमुना

जिल्हा :- ------------------------ रा.शै.सं.व प्र.परिषदेतील संबंधित विभाग -----

| अ.क्र. | मुद्दा / बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नाव | |
| २ | उपक्रमाचे नाव | |
| ३ | गाभा समिती मंजूरी दिनांक (इतिवृत्त) | |
| ४ | उपक्रम तपशील / नियोजन / उद्दिष्टे | |
| ५ | उपक्रमात सहभागी संस्था प्रतिनिधी नावे व मोबाईल क्रमांक | |
| ६ | उपक्रम अंमलबजावणी पध्दती – तपशील - उद्दिष्टे | |
| ७ | वेळापत्रक | |
| ८ | उपक्रमात अपेक्षित सहभागी शाळांची संख्या | |
| ९ | उपक्रमात अपेक्षित सहभागी शाळांची नावे / यादी | |
| १० | अपेक्षित सहभागी शिक्षक संख्या | |
| ११ | अपेक्षित सहभागी विद्यार्थी संख्या | |

स्वाक्षरी
संस्था प्रतिनिधी नाव :-
पद :-

दिनांक :-

## प्रपत्र २

### स्वयंसेवी संस्थांनी उपक्रम / कार्यक्रम सुरु झाल्यावर दर तीन महिन्यांनी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेकडे सादर करावयाच्या अहवालाचा नमुना

जिल्हा :- ------------------------ रा.शै.सं.व प्र.परिषदेतील संबंधित विभाग -----

| अ.क्र. | मुद्दा / बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नाव | |
| २ | उपक्रमाचे नाव | |
| ३ | गाभा समिती मंजूरी दिनांक (पत्राची प्रत जोडावी.) | |
| ४ | मागील तीन महिन्यातील उपक्रम तपशील / नियोजन | |
| ५ | मागील तीन महिन्यातील प्रत्यक्ष सहभागी संस्था प्रतिनिधी नावे व मोबाईल क्रमांक | |
| ६ | मागील तीन महिन्यातील प्रत्यक्ष सहभागी शाळांची नावे | |
| ७. | मागील तीन महिन्यातील शाळानिहाय प्रत्यक्ष सहभागी शिक्षक संख्या | |
| ८. | मागील तीन महिन्यातील शाळानिहाय प्रत्यक्ष सहभागी विद्यार्थी संख्या | |
| ९ | मागील तीन महिन्यातील शाळा / स्थळनिहाय प्रत्यक्ष उपक्रम अंमलबजावणीची वेळापत्रकासह माहिती | |
| १० | मागील तीन महिन्यातील शाळानिहाय उपक्रमाची प्रगती / फलनिष्पत्ती (ही माहिती मुद्देसुद, स्वयंस्पष्ट व सांख्यिकी स्वरुपातच दयावी. मोघम अभिप्राय देऊ नयेत.) | |

स्वाक्षरी
संस्था प्रतिनिधी नाव :-
पद :-

दिनांक :-

प्रपत्र ३

## स्वयंसेवी संस्थांनी उपक्रम / कार्यक्रम पूर्ण झाल्यावर त्रैमासिक अहवालासह जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेकडे सादर करावयाच्या अंतिम अहवालाचा नमुना

जिल्हा :- ------------------------ रा.शै.सं.व प्र.परिषदेतील संबंधित विभाग -----

| अ.क्र. | मुद्दा / बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नाव | |
| २ | उपक्रमाचे नाव | |
| ३ | गाभा समिती मंजूरी दिनांक (पत्राची प्रत जोडावी.) | |
| ४ | उपक्रम तपशील / नियोजन व एकूण कालावधी | |
| ५ | शाळा / स्थळनिहाय प्रत्यक्ष सहभागी संस्था प्रतिनिधी नावे व मोबाईल क्रमांक | |
| ६ | शाळा / स्थळनिहाय प्रत्यक्ष उपक्रम अंमलबजावणी माहिती | |
| ७ | प्रत्यक्ष सहभागी शाळांची नावे | |
| ८ | शाळानिहाय प्रत्यक्ष सहभागी शिक्षक संख्या | |
| ९ | शाळानिहाय प्रत्यक्ष सहभागी विद्यार्थी संख्या | |
| १० | शाळानिहाय / वर्गनिहाय उद्दिष्टांच्या संदर्भासह उपक्रमाची फलनिष्पत्ती (ही माहिती मुद्देसुद, स्वयंस्पष्ट व सांख्यिकी स्वरुपातच दयावी. मोघम अभिप्राय देऊ नयेत.) | |

स्वाक्षरी
संस्था प्रतिनिधी नाव :-
पद :-

दिनांक :-

प्रपत्र ४

गाभा समितीद्वारे मंजूर उपक्रमाचा प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेकडे सादर करावयाचा अंतिम अहवालाचा नमुना

जिल्हा :- ------------------------ रा.शै.सं.व प्र.परिषदेतील संबंधित विभाग -----

| अ.क्र. | मुद्दा / बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नाव | |
| २ | उपक्रमाचे नाव | |
| ३ | गाभा समिती मंजूरी दिनांक (पत्राची प्रत जोडावी.) | |
| ४ | जिल्हयात उपक्रम सुरु झाल्याचा दिनांक व<br>उपक्रम पूर्ण झाल्याचा दिनांक | |
| ५ | प्रकल्प कालावधीत संस्थेने जिशिप्र संस्थेकडे सादर केलेल्या सर्व त्रैमासिक अहवालांचे दिनांक | |
| ६ | उपक्रमात सहभागी शाळा संख्या | |
| ७ | उपक्रमात सहभागी विद्यार्थी संख्या | |
| ८ | उपक्रमात सहभागी शिक्षक संख्या | |
| ९ | जि.शि.प्र.संस्थेमार्फत सदर उपक्रमांतर्गत दिलेल्या भेटींची संख्या व तारिख (शाळानिहाय) | |
| १० | उपक्रमाविषयी अभिप्राय देताना स्पष्ट अभिप्राय दयावेत. चांगला / उपयुक्त यासारखे मोघम शब्द टाळावेत. जास्तीत जास्त अभिप्राय हे संख्यात्मक स्वरुपात असावेत तसेच विद्यार्थी / शिक्षक / शाळा यासाठीच्या उद्दिष्टांच्या फलनिष्पत्तीविषयी स्पष्ट उल्लेख करावा.<br>१) उपक्रमातील उत्कृष्ट बाबी<br>२) उपक्रमातील आवश्यक सुधारणा<br>३) उपक्रमाची उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली.<br>४) नमूद करण्यायोग्य विशेष बाब<br>५) शिक्षक, पालक, विद्यार्थी यांच्या सहभागाविषयी स्पष्ट अभिप्राय<br>६) संस्थेच्या कर्मचा-यांच्या कार्यक्षमतेचा पूर्ण वापर झाला किंवा कसे ? | |
| ११ | सदर उपक्रम अन्य शाळा / क्षेत्रामध्ये राबविणेबाबत स्पष्ट अभिप्राय दयावेत. | |

दिनांक :-

प्राचार्य,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण
संस्था --------------